ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गानिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 51.

वर्ष २६ पुणें, बुधवार तारीख ६ जुलै, १९६० अंक २७

## विविध माहिती

**रुबलची नवी किंमत**—रशिआच्या सुप्रीम सोव्हिएटनें रुबलला नवी किंमत देण्याच्या व वस्तूंच्या किंमती नव्यानें ठरविण्याचा निर्णय मे महिन्यांत घेतला होता. नव्या रशिअन रुबलची किंमत आजच्या रुबलच्या १० पट असेल. रुबलची किंमत बदलणार असल्यामुळें किंमतीच्या श्रेणीहि बदलाव्या लागतील. हा बदल घडवून आणण्यास तीन महिन्यांचा अवधि लागेल.

**सरकारकडून रॉयल्टी पाहिजे**—नूतन महागुजरात जनता परिषदेचे अध्यक्ष खासदार इंदुलाल याज्ञिक ह्यांनीं अशी मागणी केली आहे कीं, गुजरात राज्यांतील तेलाबद्दल मध्यवर्ती सरकारनें गुजरातला १५ टक्के रॉयल्टी द्यावी. आसाममध्यें तेथील तेलाबद्दल त्या सरकारला १२.५ टक्के रॉयल्टी देण्यांत येते अशी माहिती त्यांनीं सांगितली.

**विदर्भातील गुरांचीं इस्पितळें**—महाराष्ट्राच्या विदर्भ भागांतील गुरांचीं सर्व इस्पितळें लवकरच सरकार चालविण्यास घेणार आहे. ह्यापूर्वी तीं जनपदांमार्फत व लोकलबोर्डांमार्फत चालविलीं जात असत. जिल्ह्याच्या ठिकाणीं असलेलीं इस्पितळें अधिक अद्ययावत् करण्यांत येणार आहेत. नागपूरच्या दूध-पुरवठ्याच्या योजनेवर सरकार ७ लाख रुपये खर्च करणार आहे.

**कसोटी सामन्याचा फायदा**—भारत आणि ऑस्ट्रेलिआ ह्यांच्या क्रिकेटच्या संघांतील तिसरा कसोटी सामना गेल्या जानेवारी महिन्यांत मद्रास येथें झाला होता. कसोटी सामन्यासाठी झालेल्या तिकिटांच्या विक्रींत मद्रास असोसिएशनला १ लाख, ७७ हजार रुपये निव्वळ नफा झाला. एकूण तिकिटविक्री सुमारें ४ लाख, ४५ हजार रु. ची झाली. त्यांपैकी १ लाख रुपये क्रिकेट कंट्रोल बोर्डाला दिलेल्या हमीसाठी द्यावे लागले.

**मध्यप्रदेशाचा गहूं**—मध्यप्रदेशाची गरज भागून उरणारा शिल्लक गहूं तुटीच्या राज्यांना देण्याबाबत दिल्ली येथें लवकरच वाटाघाटी होणार आहेत. महाराष्ट्र व गुजरात ह्या राज्यांना मध्य-प्रदेशाकडून १ लाख टन गहूं मिळण्याचा संभव आहे. मध्यप्रदेश सरकारनें महाराष्ट्राला २० हजार टन व गुजरातला १० हजार टन गहूं पूर्वीच पाठविला आहे.

**जपानी सैन्यांची समजूत**—गुआम बेटावरील रहिवाशांना दोन जपानी सैनिक नुकतेच सांपडले आहेत. हे सैनिक बेटावरील जंगलांत १६ वर्षें वास्तव्य करीत होते. त्यांच्या समजुतीप्रमाणें जपान व अमेरिका ह्यांचें युद्ध अजूनहि चालूच होतें. त्यांच्या देशभक्तीबद्दल जपानच्या सरकारनें त्यांना ज्यादा पेन्शन मंजूर केलें आहे.

**हिंदी टंकलेखनाचें शिक्षण**—नवी दिल्ली येथील सचिवालयांत हिंदी टंकलेखनाचा वर्ग मध्यवर्ती सरकारच्या नोकरांसाठी काढण्यांत आला होता. मध्यवर्ती सरकारच्या गृहखात्यातर्फे तो सहा महिने चालला होता. गेल्या जानेवारींत शिक्षण देण्यास सुरुवात करण्यांत आलेली पहिली तुकडी आतां बाहेर पडली आहे.

**बचत करण्यासाठी सूचना**—रत्नागिरी जिल्ह्याच्या कले-क्टरांनीं जिल्ह्याच्या अल्प बचत सल्लागार समितीच्या सभासदांना कांहीं सूचना दिल्या आहेत. ह्या सभासदांनीं शेतकऱ्यांना व मजुरांना पान-विडी व चहा ह्यांच्यावरील खर्चांत बचत करण्यास प्रवृत्त करावें म्हणजे अल्प बचत योजना यशस्वी होण्यास मदत होईल असें त्यांचें म्हणणें आहे. तसें करण्यांत आल्यास १८ लाखांचें उद्दिष्ट गांठतां येईल अशी त्यांची अपेक्षा आहे.

**गुळाच्या उत्पादनांत घट**—अहमदनगर जिल्ह्यांतील गुळाच्या उत्पादनांत बरीच घट झाली आहे. गेल्या वर्षी २८ लाख मण गूळ तयार करण्यांत आला होता. ह्या वर्षी गुळाचें उत्पादन अवघें ११ लाख मण झालें आहे. गुळाला मागणीहि कमी असल्यानें मोठ्या प्रमाणावर सांठा करणाऱ्या व्यापाऱ्यांना २५ लाख रुपयांचें नुकसान सोसावें लागण्याचा संभव आहे.

**वैवाहिक सौख्यासाठी सल्ला**—गुजरातेंत व विशेषतः सौराष्ट्रांत स्त्रियांच्या आत्मघाताचें प्रमाण फार आढळून येतें. हें प्रमाण कमी करण्याच्या हेतूनें भारत सेवक समाजानें अहमदाबाद येथें एक सल्लाकेंद्र उघडण्याचें ठरविलें आहे. यशस्वी व समाधानाचें वैवाहिक जीवन असें घालवावें ह्या बाबतींत केंद्रातर्फे विवाहितांना सल्ला देण्यांत येईल.

**हिंदी संशोधकाला मदत**—दिल्ली येथील डॉक्टर अजय घोष ह्यांना चार अमेरिकन संस्थांकडून वैद्यकीय संशोधन करण्या-साठी १० हजार डॉलर्स मदत मिळाली आहे. मानसिक आरोग्य व कॅन्सर ह्याविषयीं त्यांनीं संशोधन करावयाचें आहे. डॉ. घोष हे अलहाबाद विद्यापीठाचे विद्यार्थी आहेत. त्यांनीं १९५० मध्यें अमेरिकेंतील मॅसॅच्युसेट्स येथील तांत्रिक संस्थेकडून पदवी मिळविली आहे.

**परदीप बंदराचा विकास**—ओरिसा सरकारनें परदीप बंदराच्या विकासाची योजना तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत समाविष्ट केली आहे. बंदराच्या विकासासाठी २.६४ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. १९५८ सालीं, परदीप छोटें बंदर म्हणून जाहीर करण्यांत आलें होतें. आतां तें मध्यम प्रतीचें करण्यांत येणार आहे.

## इंग्लंडमधील पहिली बँक मॅनेजर

### काय म्हणते ?

बॉर्क्लेज बँकेनें कु. हिल्डा हार्डिंग हिला एका शाखेचे मॅनेजर नेमून बँकिंग क्षेत्रांत क्रांति केली. तिची मुलाखत वाचा.

*जगांत इतर कुठं स्त्रिया बँक मॅनेजर आहेत का ?*

**कु. हार्डिंग :** माझ्या माहितीप्रमाणें दोनच–एक चीनमध्यें आणि एक शिकॅगोंत. मला वाटतं, शिकॅगो बँक फक्त स्त्री–गिन्हाइकांशींच व्यवहार करते.

*आपल्या देशांत लवकर आणखी स्त्रिया बँक मॅनेजर होतील का ?*

**कु. हार्डिंग :** होय, माझी खात्री आहे. बॉर्क्लेजनीं आघाडी मारली, म्हणून कांहीं बँकांना जरा वैषम्य वाटत असल्याचं त्यांनीं मला बोलून दाखवलं आहे.

*इतर व्यवसायांत स्त्रियांनी इतकी प्रगति केली आहे; मग बँकिंगमध्यें त्यांना वरपर्यंत पोंचायला का वेळ लागत आहे ?*

**कु. हार्डिंग :** बँका रूढी पाळणाऱ्या असतात हें तर खरेंच; पण मला वाटतें, स्त्रियांकडेच दोषांचा मोठा वांटा जातो. युद्धापूर्वी ज्या स्त्रियांनीं बँकेंत नोकरी धरली, त्यांनीं त्याच्याकडे व्यवसाय ह्या दृष्टीनं पाहिलंच नाहीं. लग्न होईपर्यंत वेळ काढण्याचीच दृष्टि होती. पुरुषांच्याप्रमाणें बँकिंगच्या परीक्षा द्याव्या, अभ्यासक्रम पुरे करावे, असं त्यांना वाटलंच नाहीं. त्या कारणानं, पुरेशा लायकीच्या अन् लोकांच्याविषयीं पुरेसा अनुभव असलेल्या स्त्रिया, वरच्या जागीं नेमायच्या म्हटलं तरी, आहेत कुठं ?

*तुमच्या नेमणुकीकडे पहाण्याची तुमच्या बरोबरीच्या पुरुषांची प्रवृत्ति कशी आहे ?*

**कु. हार्डिंग :** ते सर्व फार चांगले वागतात. पण माझ्या बोलकेपणामुळें बँकिंगच्या वातावरणाचा अद्भुतपणा कमी झाल्याची तक्रार झाल्याचें ऐकिवांत आहे.

*बँकर्सनीं असे गंभीर आणि भीतिदायक असायची आवश्यकता आहे काय ?*

**कु. हार्डिंग :** गिन्हाइकांशीं होणारे व्यवहार गुप्त राखले पाहिजेत, हें उघड आहे. पण त्याच्याहि पलीकडे जाण्याचें मला तरी कारण दिसत नाहीं. लोकांनीं मित्रत्वाच्या भावनेनं बँकेंत यावं, ह्यासाठी मी प्रयत्न करतें. लंडनला आल्यावर त्यांनीं आमच्या रायटिंग रूमचा आणि क्लोकरूमचा आपुलकीनं खुशाल उपयोग करावा !

*तुमच्या प्रदेशांत तुम्हांला इतर बँकांची बरीच तीव्र स्पर्धा आहे ना ?*

**कु. हार्डिंग :** होय ना. आम्ही इथं नव्यानंच, खातें नंबर १ पासून, सुरवात केली. इतर बँका आधीं होत्याच. आम्ही त्यांच्यापेक्षा जास्त कार्यक्षम आणि मदत करायला तत्पर आहोंत, हें ज्यांना पटेल, तेच आमच्याकडे येणार.

*मॅनेजरच्या खुर्चीवर स्त्री आहे, ह्याचा पुरुष खातेदारांवर कांहीं परिणाम होतो का ?*

**कु. हार्डिंग :** ज्यांनीं खातीं उघडलीं, त्यांना त्याची आधीं माहिती होतीच. व्यवहारांत त्याचा कांहींच संबंध येत नाहीं. पण, स्त्रियांनीं मात्र मला खूपच पाठिंबा दिला आहे; त्यांची मी खरोखरच ऋणी आहें.

*तुमच्या हाताखालीं कांहीं पुरुष कामाला असतील नाहीं का ? त्यांत कांहीं अडचण भासते का ?*

**कु. हार्डिंग :** होय, दोघे पुरुष आहेत. दोन पुरुष अन् चार स्त्रिया. जरा कुचंबल्यासारखं वाटतं, अशी पुरुषांची तक्रार आहे; पण खरं म्हटलं तर ते खुषींत दिसतात.

*आणखी स्त्रियांना अशाच वरच्या जागा मिळाव्यात, असं तुम्हांला वाटतं का ?*

**कु. हार्डिंग :** ज्यांची विशेष लायकी आहे, अशांना भरपूर संधि आहे असंच माझं मत आहे.

---

## महाराष्ट्र विभागांतील मध्यवर्ती सहकारी बँका

### ३०–६–१९५९ रोजींचे तुलनात्मक आंकडे ( लक्ष रु. )

| मध्यवर्ती बँकेचें नांव | सभासद | | वसूल भांडवल | | रिझर्व्ह व इतर फंड |
|---|---|---|---|---|---|
| | सोसायट्या | व्यक्ति | सोसायट्यांचें व व्यक्तींचें | सरकारी | |
| पू. खानदेश | १,१४८ | ३,०९५ | ३२·४५ | ५·०० | ६९·९३ |
| कोल्हापूर | ६८५ | १,८३७ | १२·४५ | १२·०० | २५·४८ |
| नाशिक | ७६० | १,९६० | ९·३७ | ७·०० | १६·७८ |
| उत्तर सातारा | ६०५ | १,८७३ | ३·७८ | ३·२५ | ९·३४ |
| पुणें | ९२२ | ५,४०६ | १३·१३ | १०·०० | ३७·५४ |
| श्रीलक्ष्मी | ८७ | १,१३५ | १·९९ | १·५० | ६·०३ |
| द. सातारा | ५१६ | ७६२ | ५·५२ | ५·५० | १३·६७ |
| सोलापूर | ८४२ | ३,२१८ | ५·७४ | ३·२५ | २१·१९ |
| अहमदनगर | ७१० | ४७८ | १९·८२ | १५·०० | ३४·८५ |
| प. खानदेश | ७०९ | १५५ | ७·७१ | ६·०० | १३·९६ |
| रत्नागिरी | १६५ | ४४ | १·०३ | १·०० | २·०४ |
| ठाणें | ३५३ | ११६ | १·८८ | २·०० | ३·८८ |
| एकूण | ७,५०२ | २०,०७९ | ११४·८७ | ७१·५० | २५४·६९ |

| मध्यवर्ती बँकेचें नांव | ठेवी | दिलेलीं कर्जें | खेळतें भांडवल | कर्जाचें प्रमाण % | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | ठेवींशीं | खेळत्या भांडवलाशीं |
| पू. खानदेश | ३२३·८१ | २१०·३५ | ४८७·३४ | ६४·८ | ४३·१ |
| कोल्हापूर | ८६·५० | १४४·३१ | १९९·९६ | १६६·८ | ७२·२ |
| नाशिक | ९१·६० | १०८·८५ | १६८·९१ | ११८·८ | ६४·४ |
| उत्तर सातारा | ८४·९० | ५४·२४ | ११४·२८ | ६३·८ | ६८·२ |
| पुणें | २४५·२९ | २१९·२९ | ३५१·४९ | ८९·४ | ६२·३ |
| श्रीलक्ष्मी | १८·४६ | १७·७६ | ३३·०७ | ९६·२ | ५३·७ |
| द. सातारा | ७४·१२ | ७८·५४ | १२०·८२ | १०५·९ | ८५·० |
| सोलापूर | १२९·१९ | ८१·०० | १८९·०० | ६२·६ | ४२·८ |
| अहमदनगर | १२६·२२ | २३३·८३ | ३०२·२७ | १८५·२ | ७७·३ |
| प. खानदेश | ११४·७५ | ८६·०७ | १६०·८३ | ७५·० | ५३·५ |
| रत्नागिरी | १९·४८ | ८·०० | २२·७५ | ४१·० | ३५·१ |
| ठाणें | ४६·०३ | २३·८० | ५५·८२ | ५१·७ | ४२·६ |
| एकूण | १३६०·३५ | १२६६·०४ | २२०६·५४ | ९३·१ | ५७·२ |

# अर्थ

बुधवार, ता. ६ जुलै, १९६०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## एकरीं पिकाची वाढ होण्याची आवश्यकता

सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ. राधा कुमुद मुकर्जी ह्यांनीं भारताच्या आर्थिक परिस्थितीविषयीं आणि विशेषत: शेतीच्या विकासासंबंधीं कांहीं महत्त्वाचे विचार मुंबई येथें बोलतांना व्यक्त केले आहेत. डेमॉक्रॅटिक ग्रुपतर्फे भरविण्यांत आलेल्या एका सभेत भाषण करतांना ते म्हणाले कीं, भारतापुढें असलेला अन्नधान्याच्या टंचाईचा प्रश्न सोडवावयाचा असेल तर दर एकरीं होणाऱ्या धान्याच्या उत्पादनांत वाढ करण्याशिवाय दुसरा मार्गच नाहीं. हिंदमधील शेतकरी गरीब आणि अज्ञानी आहे. त्याला जागच्या जागीं मदत मिळण्याची आवश्यकता आहे. अशी मदत देण्यासाठीं मुद्दाम शिकवून तयार केलेले शेतकीतज्ज्ञ खेड्याखेड्यांतून पाठविण्यांत आले पाहिजेत. तरच अन्नधान्याच्या दर एकरीं उत्पादनांत वाढ करतां येणें शक्य होईल. भारतामधील छोट्या शेतकऱ्यांना देशाच्या अर्थव्यवस्थेंत कायमचें स्थान देण्यांत आलें पाहिजे. त्यांच्या अडचणींचा परिहार करण्यांत आला पाहिजे. हुशार व शिक्षित शेतकरी—कार्यकर्त्यांच्या सहकार्यानें त्यांच्या प्रत्यक्ष गरजा भागविण्यांत आल्या तर हा छोटा शेतकरी कसोटीला उतरल्याशिवाय राहणार नाहीं. कांहीं लोक जमिनीचें राष्ट्रीयिकरण करण्याचा उपाय सुचवीत असतात. पण त्यांनीं हें लक्षांत ठेवावें कीं, भारतामधील जमीन मर्यादित आहे. त्यामुळें प्रत्येक शेतकऱ्याला आर्थिकदृष्ट्या कसणें परवडेल इतकी जमीन देणें शक्य होणार नाहीं. केवळ घोषणा करून हा प्रश्न सुटण्यासारखा नाहीं.

आणखी कांहीं वर्षें तरी भारताला दरसाल सुमारें २० ते ३० लाख टन अन्नधान्य कमी पडणार आहे. कारण, अन्नधान्याचें वाढणारें उत्पादन व लोकसंख्येची वाढ ह्यांच्यांतील प्रमाण व्यस्त आहे. भारताच्या अंदाजपत्रकांत देशाच्या दारिद्र्याचें प्रतिबिंब उमटलेलें दिसतें. आर्थिक क्षेत्रांतील उत्पादनाचे अमेरिकेचे व ब्रिटनचे आंकडे लक्षांत घेतले तर हें दारिद्र्य चटकन् लक्षांत येण्यासारखें आहे. अन्नधान्याचा व खाद्यवस्तूंचा भरपूर पुरवठा करण्यापुरताच हा प्रश्न मर्यादित नाहीं. अन्नपदार्थांच्या दर्जाकडेहि लक्ष पुरविणें आवश्यक आहे. इतर देशांच्या आहाराशीं तुलना करतां भारतामधील लोकांचा आहार फार निकृष्ट दर्जाचा आहे. त्या आहारांत पोषणाला जरूर असणारीं सत्त्वें बेताचींच असतात. गेल्या कांहीं वर्षांत अनेक देशांकडून भारतानें विकासासाठीं मोठीं कर्जें घेतलेलीं आहेत. ज्या उद्योगधंद्यांच्या विकासासाठीं तीं देण्यांत आलेलीं आहेत, त्यांचा विकास होऊन उत्पादन वाढत आहे कीं नाहीं ह्याची तपासणी करण्यांत आली पाहिजे. अशी उत्पादनवाढ झाली तरच घेतलेलीं कर्जें परत करतां येणें शक्य होणार आहे; तरच घेतलेल्या कर्जाचा उपयोग योग्य रीतीनें करण्यांत येत आहे असें म्हणतां येईल. सभेचे अध्यक्ष इंडियन मर्चंटस् चेंबरचे माजी अध्यक्ष श्री. लालचंद हिराचंद हे होते. ते आपल्या भाषणांत म्हणाले कीं, युद्धोत्तर कालांत पश्चिम जर्मनी, जपान, इत्यादि देशांनीं आश्चर्यकारक प्रगति करून दाखविलेली आहे. ही प्रगति त्यांना कशी करतां आली असा प्रश्न साहजिकच विचारला जातो. ह्या देशांच्या प्रगतीपासून भारताला पुष्कळच शिकतां येण्यासारखें आहे.

---

## अकोल्याची लक्ष्मी बँक कां गुंडाळण्यांत आली?

### रिझर्व्ह बँकेच्या अर्जांतील तपशील

अकोल्याची लक्ष्मी बँक गुंडाळण्यांत यावी, असा महाराष्ट्र हायकोर्टानें हुकूम केला आहे. रिझर्व्ह बँकेनें बँकिंग कंपन्यांच्या कायद्याच्या ३८ व्या कलमाखालीं अर्ज केल्यावरून हा हुकूम करण्यांत आला. रिझर्व्ह बँकेनें आपल्या अर्जांत म्हटलें होतें, कीं तिला कांहीं माहिती मिळाल्यावरून तिनें लक्ष्मी बँकेची मुख्य कचेरी व शाखा ह्यांची तपासणी केली, तेव्हां असमाधानकारक परिस्थिति तिच्या दृष्टोत्पत्तीस आली. अर्जदाराच्या निवेदनाप्रमाणें, लक्ष्मी बँकेच्या ४० पैकीं २२ शाखांत मिळून २० मे रोजीं किंवा त्या सुमारास ५५,१७,००० रु. ची कॅश कमी आढळली. बँकेचे चेअरमन, त्यांचे नातेवाईक, मित्र किंवा धंद्यांतले सहकारी ह्यांचा ज्यांत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष हितसंबंध आहे अशा १५ फर्म्सकडून बँकेची ४२,०६,००० रु. एवढी रक्कम 'ड्यू अँड पेएबल' होती. कॅशमधील तुटीचें मुख्य कारण बँकेच्या चेअरमननीं आपल्या एका एजंटामार्फत पैसे काढून घेतले हें होय, असेंहि अर्जदार रिझर्व्ह बँकेनें म्हटलें आहे. ज्या फर्ममध्यें चेअरमनचा हितसंबंध आहे अशाच्या नांवें चेक काढण्यांत आले, पण बँकेच्या शाखांच्या हिशोबांत ते 'हातांतील कॅश' म्हणून दाखविण्यांत आले.

---

### आयुर्विम्याची व्याप्ति वाढविण्याचा प्रयत्न

आयुर्विमा कॉर्पोरेशननें आयुर्विम्याचें काम वाढविण्याच्या हेतूनें एक नवीन योजना आंखली आहे. सध्यां भारतामधील आयुर्विम्याचा बहुतेक धंदा मुख्यत: शहरांपुरताच मर्यादित आहे. कॉर्पोरेशनच्या नव्या योजनेप्रमाणें तो ग्रामीण भागांतहि करण्याची सोय होईल. ह्या नवीन विमायोजनेंत वैद्यकीय तपासणीशिवाय पॉलिसी देण्यांत येतील. ग्रामीण विभागांत ज्या ठिकाणीं वैद्यकीय तपासणी करणारे डॉक्टर्स मिळणें कठीण जातें अशीं कांहीं ठिकाणें निवडण्यांत येणार आहेत. सामान्यपणें ज्या ठिकाणच्या आसपास १० मैलांत वैद्यकीय तपासणीस मिळूं शकणार नाहींत अशा ठिकाणांची निवड करण्यांत येईल. ह्या ठिकाणांतील जे पुरुष विमा घेण्यास पात्र असतील अशांना वैद्यकीय तपासणी न करतां पॉलिसी देण्यांत येईल. जास्तींत जास्त २,००० रुपये दर्शनी किंमतीच्या पॉलिसी कोणत्याहि एका माणसाला देण्यांत येतील. जे पुरुष ४५ वर्षें वयाचे अगर त्यापेक्षा कमी वयाचे असतील त्यांनाच ह्या योजनेचा फायदा घेतां येईल. जास्तींत जास्त २५ वार्षिक हप्ते भरण्याच्या मुदतीची पॉलिसी देण्यांत येईल. वयाच्या दृष्टीनें अधिकांत अधिक ६० वर्षें वयानंतर हप्ते बंद होतील अशा पॉलिसी देण्यांत येतील. विमा घेणारे जे पुरुष निरक्षर असतील त्यांच्या पॉलिसीवर एक वर्षपर्यंत कांहीं रकमेचा बोजा ठेवण्यांत येईल. कॉर्पोरेशनच्या ह्या निर्णयामुळें विम्याच्या धंद्याचें क्षेत्र विस्तार पावेल व नवा धंदा अधिक प्रमाणांत उपलब्ध होईल अशी अपेक्षा आहे. योजनेचा जो अनुभव येईल, त्याचा विचार मधूनमधून करण्यांत येईल.

## संसाराकडे बघण्याचा उचित दृष्टिकोन

श्री. केदारनाथजी यांचें 'विवेक आणि साधना' हें पुस्तक मराठींत प्रसिद्ध होऊन ७-८ वर्षे झालीं. विवेक-साधना, विचारदर्शन भाग १, सुसंवाद, हीं त्यांचीं पुस्तकें गुजराती व हिंदी भाषेंतहि प्रसिद्ध झालेलीं आहेत. त्यांपैकीं विवेक-साधना व सुसंवाद यांची सध्यां तिसरी आवृत्ति चालू आहे. 'सुसंवाद'* यांतील विचार श्री. केदारनाथजींचे आहेत व त्याचे संग्राहक श्री. मश्रूवाला आहेत. या पुस्तकांतील संवाद 'प्रसाद' मासिकाच्या फेब्रुवारी व मार्च १९५९ च्या अंकांत येऊन गेले आहेत. या पुस्तकाचें प्रकाशन श्री. कान्तिलाल मोहनलाल परीख ह्यांनीं आतां केलें आहे.

श्री. केदारनाथजींच्या विचारांचें वाचन व मनन, जीवन चांगल्या तऱ्हेनें उपयोगांत आणण्याची इच्छा निर्माण करील व तिला कार्यप्रवण करील, ह्यांत संशय नाहीं. "संसार व जीवन ह्यांकडे पाहण्याची योग्य दृष्टि" ह्या प्रकरणाकडे आम्ही वाचकांचें विशेष लक्ष वेधतों. त्यांत श्री. केदारनाथजी म्हणतात :—

युरोपचे लोक फार उद्योगी. त्यांच्यांत किती उत्साह आहे. नवनवे शोध, विद्या आणि नवनव्या शास्त्रांचा विचार ते करीतच आहेत. 'आसुरी, आसुरी' म्हणून आपण त्यांच्या प्रवृत्तीची निंदा करतों परंतु आमची आजची निवृत्ति तरी आसुरी नाहीं काय? आमच्याकडे कोणती गोष्ट विचारपूर्वक होत आहे? आपण विचारपूर्वक उद्योगी झालों, विवेक व ज्ञानपूर्वक आपल्या गरजा आपण कमी केल्या तर त्याला सात्त्विक त्याग म्हणतां येईल. आज आपल्याला सर्व सोयी, सर्व सुखें पाहिजेत; मौज, चैन सर्व कांहीं पाहिजे. परंतु त्याला लागणारी सर्व खटपट, विद्या, कला, शास्त्रीय शोध, हे सर्व दुसऱ्यांनीं करावे असें आपण इच्छितों. आपल्यांतील विरक्त, धर्माचार्य वगैरे सर्वांची हीच वृत्ति. पश्चिमेचे लोक सुख भोगूं इच्छितात, पण त्याकरितां लागणारें ज्ञान, विज्ञान, कला यांच्या प्राप्तीचाहि प्रयत्न ते करतात. ही मी समग्र राष्ट्र-समाजाची गोष्ट करीत आहें. दोन्ही ठिकाणीं अपवादरूप व्यक्ति असतीलच. परंतु एकंदर विचार करतां भारतीय समाज प्रमादांत पडलेला आहे. आणि पाश्चात्य समाज उद्योगी पण भौतिक सुखाचे मार्गे लागलेला आहे.

साधुसंतांच्या उपदेशामुळें कित्येक लोक जग खोटें, आप्तसंबंधी स्वार्थी किंवा खोटे वगैरे मानतात व काल्पनिक देव आणि त्यांचीं निरनिराळीं दिव्य स्थानें यांच्याविषयीं श्रद्धा बाळगून सांसारिक आवश्यक कर्तव्यकर्माविषयीं बेपर्वा किंवा उदासीन राहतात. पूर्वकाळीं आश्रम-व्यवस्थेमुळें प्रत्येकाला क्रमशः एकामागून एक आश्रमाचीं कर्तव्यें पुरीं करीत पुढें जावें लागे. त्यामुळें सहजच त्याची उन्नति होत असे आणि शेवटीं संन्यास किंवा सेवावृत्ति धारण करून त्याला स्वतःचें जीवन व्यतीत करावें लागे किंवा पात्रतेप्रमाणें निर्वाणप्राप्तीकरितां त्याला कांहीं साधना करावी लागे. परंतु आज समाजव्यवस्था भंगून गेली आहे. तींत कांहीं अर्थच राहिलेला नाहीं.

संसार असत्य आहे, संसार माया आहे, अशा प्रकारचीं वचनें आपण वाचीत व ऐकत आलों आहों. पण आपण जो त्यांचा रूढ अर्थ मानीत आहों त्या अर्थानें तीं सांगितलेलीं नसावीं असें मला वाटतें. आपण ममत्वानें अशाश्वताला शाश्वत मानतों हीच आपली भूल. यापेक्षा अधिक अर्थ या वचनांत नाहीं. संसार खरोखरच जर नसता तर तो असत्य आहे असें सांगण्याचें कारणच पडलें नसतें. आणि तो खरोखरच नाहीं अशी प्रचीति कोणासहि आली असल्याचें कोणाच्या वचनावरून, ग्रंथावरून वाटत नाहीं. म्हणून त्या वचनांचा खोटा अर्थ न मानतां संसाराची खरी स्थिति लक्षांत घेऊन वागावें.

विकारांना जिंकून सद्भावनांना शुद्ध व व्यापक करीत, त्यांचे सद्गुणांत पर्यवसान करून मनुष्य जीवन चालवूं शकला कीं त्याला सर्व कांहीं लाभलें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. या रीतीनें जीवन चालवतां येण्याकरितां जो प्रयत्न करावा लागेल तो मनुष्यानें केलाच पाहिजे; त्याला कंटाळून चालणार नाहीं. नाहींतरी संसाराला केवळ असत्य मानीत राहिल्यानें मनुष्य कोणत्या बंधनांतून सुटत आहे? खाणें, पिणें, देहरक्षणाच्या आवश्यक सुखसोयी, यांपैकीं त्याला काय सुटत आहे? फार झालें तर त्या प्राप्त करण्याकरितां लागणारा पुरुषार्थ, परिश्रम वगैरेंचा कोणी त्याग करूं शकेल इतकेंच. पण त्यांत त्यानें काय साधलें? वस्तूंचा उपभोग घ्यावा, उपयोग करावा; पण त्या निर्माण करण्याला, संभाळण्याला लागणाऱ्या पुरुषार्थाचा, विद्या-कला-परिश्रम वगैरेंचा मात्र मनुष्यानें त्याग करावा? म्हणजे या सर्व गोष्टी तयार करण्याला लागणाऱ्या पुरुषार्थाचा व परिश्रमाचा भार दुसऱ्यांवर टाकून त्यापासून मिळणाऱ्या सुखसोयींचा लाभ मात्र आपण घ्यावा? संसार असत्य मानून हे सर्व लाभ अशा रीतीनें मनुष्यानें घेत राहणें ही मानवतेच्या दृष्टीनें त्याची अवनति आहे. या अवनतीला कारण त्याच्या खोट्या समजुती व भ्रम हे महान् दोष आहेत असें वाटतें. ज्याला संसार असत्य वाटतो त्याला स्वतःच्या सुखसोयी सत्य कां वाटाव्या? त्याला त्यांची जरूर कां वाटावी? व त्या सर्व जर त्याला असत्य वाटत नाहींत तर त्यांकरितां लागणारे परिश्रम, कष्ट, विद्या वगैरेंचा त्यानें कंटाळा कां करावा? जगत् असत्य, संसार असत्य या दृष्टीनें विचार करतां आपलें शरीरहि असत्य ठरतें. मग त्या शरिराला संभाळण्याची जरूर काय? म्हणून परंपरेनें चालत आलेल्या या प्रकारच्या वचनांवर या रीतीनें विश्वास व श्रद्धा न ठेवतां मानवी जीवन व जगत् याविषयीं आपण स्वतः विचार करावा व त्यावरून आपलें जीवन ठरवावें.'

* "सुसंवाद" (श्री. केदारनाथजीबरोबर झालेले जीवनविषयक संवाद. संग्राहक : श्री. नीलकंठ ईश्वरदास मश्रूवाला. प्रकाशक : कांतिलाल मोहनलाल परीख. पृ. सं. ५५, किं. ४० नये पैसे)

---

### सूचना किफायतशीर ठरल्या

"ईस्टमन कोडॅक कंपनी"च्या रॉचेस्टर (न्यूयॉर्क) येथील मुख्य कचेरींत काम करणाऱ्या नोकरांनीं १९५९ सालीं कंपनीला नवीन कल्पना सुचविल्याबद्दल त्यांना चांगल्या प्रकारचीं बक्षिसें मिळालीं आहेत. मालाची प्रत सुधारण्यासाठीं काय केलें पाहिजे, अगर उत्पादनाच्या पद्धतींत कोणती सुधारणा होणें इष्ट आहे, यासंबंधींच्या स्वीकारलेल्या सूचनांसाठीं कंपनीनें आपल्या नोकरांना ३,१३,००० डॉलरची रक्कम वांटून दिली. सादर केलेल्या कल्पनांपैकीं सुमारें ४० टक्के कल्पनांचा स्वीकार केला गेला. नोकरांपैकीं सुमारें एक-चतुर्थांश नोकरांनीं सूचना सादर केल्या.

---

**मोठ्या हिऱ्याचा लिलाव**—लंडनमधील एका प्रसिद्ध लिलाववाल्यातर्फे एका फार मोठ्या सुंदर हिऱ्याचा लिलाव लवकरच करण्यांत येणार आहे. हा हिरा सुटा असून त्याचें वजन सुमारें ४९ कॅरेट आहे. युरोपमधील एका अज्ञात राजघराण्यांतील व्यक्तीकडून तो लिलावासाठीं पाठविण्यांत आला आहे.

## छोट्या उद्योगधंद्यांना बँकांकडून कर्जपुरवठा

### कर्जास हमी देणारी योजना १ जुलैपासून सुरू

छोट्या उद्योगधंद्यांना बँका आणि कर्जपुरवठा करणाऱ्या संस्था यांकडून मिळणाऱ्या कर्जाऊ रकमांबद्दल हमी देणारी एक योजना भारत सरकारनें तयार केली आहे. तिची अंमलबजावणी १ जुलै, १९६० पासून करण्यांत आली.

कर्जाऊ दिलेल्या रकमा बुडण्याची संभाव्य आपत्ति लक्षांत घेऊन अशा प्रसंगीं बँकांना त्याबाबत संरक्षण देण्याची हमी देऊन त्यांजकडून औद्योगिक कारखान्यांना अधिक प्रमाणांत कर्जपुरवठा व्हावा अशा हेतूनें ही कर्ज हमी योजना चालू करण्यांत आली असून, पहिल्यांदा प्रयोगादाखल ती दोन वर्षे अंमलांत आणली जाईल. दिलेल्या कर्जापैकीं कांहीं रक्कम वसूल होण्यासारखी नसल्यास कर्ज पुरवणाऱ्या संस्था आणि भारत सरकार यांनीं मिळून ही नुकसानी सोसावी अशी तरतूद सदर योजनेंत आहे. मात्र अशा हमीअन्वयें मिळूं शकणाऱ्या रकमेची कमाल मर्यादा कोणत्याहि एका प्रकरणीं १ लक्ष रुपये राहील.

### २२ जिल्ह्यांत अंमलबजावणी

प्रथमतः ही योजना देशांतील २२ जिल्ह्यांत चालू करण्यांत यावयाची असून, त्यांत महाराष्ट्रांतील बृहन्मुंबई आणि कोल्हापूर जिल्हा यांचा अंतर्भाव आहे. प्रत्यक्ष कामकाजास प्रारंभ होऊन कांहीं काळ लोटल्यानंतर आणखी इतर जिल्ह्यांतहि ती सुरू करण्यांत येईल.

देशांतील निरनिराळ्या छोट्या उद्योगधंद्यास कर्ज पुरवठा करणाऱ्या निरनिराळ्या ९५ संस्थांनीं दिलेल्या कर्जांच्या बाबतींतच ही योजना सध्यां लागू असून स्टेट बँक ऑफ इंडिआ व तिच्या ९ दुय्यम बँकांच्या जोडीस ६९ शेड्यूल्ड बँका, २२ राज्य सहकारी बँका, १४ राज्य फायनान्शिअल कॉर्पोरेशनें व इतर संस्था, यांचा अंतर्भाव होतो.

### योजनेच्या कक्षेंत बसणारे छोटे उद्योगधंदे

कामगारांसाठी बांधलेलीं घरें व इतर सुखसोयी यांवरील झालेला खर्च वगळून, परंतु भाड्याची जागा असल्यास तें भाडें धरून ५ लक्ष रुपयांपर्यंत भांडवली खर्च करावा लागलेला कारखाना अशी या योजनेच्या दृष्टीनें छोटे उद्योगधंद्यांची व्याख्या ठरविण्यांत आलेली आहे. मात्र हा कारखाना जागा निवडलेल्या जिल्ह्यांत असला पाहिजे.

एक जुलै १९६० पासून दिलेल्या कर्जांच्या बाबतींत ही हमी-योजना लागू होईल. यापूर्वीच्या कर्जांच्या बाबतींतहि परतफेड समाधानकारक होत असल्यास त्या कर्जांचें नूतनीकरण करण्याच्यावेळे त्याची मुदत वाढवून घेण्याच्या बाबतींत हमी मिळवितां येईल.

### कोणत्या कर्जास हमी मिळते ?

कायम स्वरूपाची मालमत्ता किंवा सामुग्री घेण्यासाठी वा खेळत्या भांडवलाचा पुरवठा व्हावा म्हणून कर्जाऊ घेतलेल्या रकमांच्या बाबतींतच ही योजना लागू होईल. तसेंच ज्या कामांसाठी कर्ज दिलेलें असेल त्याच कामासाठी तें वापरलें गेलें पाहिजे अशीहि एक आवश्यक अट या योजनेंत ठेवलेली आहे.

कर्ज मंजूर करण्यापूर्वी किंवा त्यानंतरहि हमी मिळविण्याकरतां अर्ज करतां येतील. हमीची मुदत प्रारंभीं सामान्यतः एक वर्षाची राहील व कोणत्याहि प्रकरणीं हमीची एकूण मुदत कर्ज प्रत्यक्ष दिल्याच्या दिनांकापासून सात वर्षांपेक्षा अधिक असणार नाहीं.

हमी देण्याची सोय केल्याबद्दल कर्जाच्या कमाल रकमेच्या पाव टक्का या प्रमाणांत हमीच्या मुदतीसाठी प्रतिवर्षी आगाऊ आकार द्यावा लागेल. कर्जपुरवठा करणाऱ्या संस्थांस छोट्या औद्योगिक कारखान्यांना अधिक प्रमाणांत कर्ज देण्यास उत्तेजन मिळावें या हेतूनें तूर्त हा आकार इतका अल्प ठेवलेला आहे.

### कारभार यंत्रणा

सदर योजनेचा कारभार भारत सरकारचे प्रतिनिधी म्हणून रिझर्व्ह बँकेकडे सोंपविण्यांत आला असून, तीस हमीविषयक संघटना असें या बाबतींत संबोधण्यांत येईल. या योजनेसंबंधींचें सर्व कामकाज रिझर्व्ह बँकेतील मुंबई येथील इंडस्ट्रियल फायनान्स डिपार्टमेंटमधील हमी संघटना विभागाकडे राहील.

या योजनेखालीं येणाऱ्या नुकसानभरपाईच्या मागण्या प्रकरणांत वेळ लागू नये म्हणून व यासंबंधीं पुराव्याचे सर्व कागदपत्र मिळाल्यावर ३० दिवसांत नुकसानभरपाईची रक्कम दिली जाईल. याबाबत ही संघटना प्रयत्नशील राहील.

वर म्हटल्याप्रमाणें या योजनेच्या प्रयोगाचीं दोन वर्षे संपल्यानंतर हमीचें स्वरूप व कालमर्यादा आणि त्याबद्दलचा आकार इत्यादि सर्व तपशीलासह या योजनेचा फेरविचार करण्यांत येईल.

---

## भारतीय भांडवल गुंतवणूक केंद्र

### अमेरिकेबरोबर झालेला करार

भारत सरकार आणि अमेरिका सरकार या दरम्यान भारतीय भांडवल गुंतवणूक केंद्राची स्थापना करण्यासंबंधीं २१ जून रोजीं नव्या दिल्लींत करार झाला. या केंद्राला सदर करारानुसार अमेरिका तांत्रिक सहकार्य मंडळामार्फत सुमारें ५९,१०,००० रुपये मूल्याची मदत मिळणार आहे. यांपैकी ७,१३,००० डॉलर (३४ लक्ष रुपये) परकीय चलनांतील खर्च भागविण्याकरितां वरील तांत्रिक मंडळाकडून मिळतील तर अमेरिकेनें भारतास पुरविलेल्या शेतमालाच्या विक्रींतन २५ लक्ष रुपये स्थानिक खर्चासाठी वापरण्यांत येतील.

सदर केंद्राचा उपयोग, विशेषतः परकीय साह्य मिळण्याची शक्यतो अजमाविण्याकरितां भरपूर वेळ व पैसा देऊं न शकणाऱ्या छोट्या व मध्यम प्रतीच्या व्यापारीवर्गास होऊं शकेल. भारताच्या आर्थिक व्यवहारास आणि पंचवार्षिक योजनेंतील उद्दिष्टांस अत्यंत उपयुक्त ठरेल अशा रीतीनें भारतांत परदेशीय भांडवलाचा ओघ वळविण्यास साह्यभूत होणें हा सदर केंद्राचा हेतु आहे.

या भांडवल गुंतवणूक केंद्रांत पुढील स्वरूपाची माहिती व मदत मिळूं शकेल :—(१) उत्पादन, व्यापार, बाजारपेठा, मजूरवर्ग, साधनसंपत्ति, इत्यादि संबंधी माहिती (२) सरकारी आर्थिक, भांडवलविषयक व औद्योगिक धोरणें या बद्दलाची माहिती (३) औद्योगिक संस्था व बँका आणि भांडवल गुंतवणुकीसंबंधींचे कायदे-कानू याबद्दलची माहिती (४) परकीय भांडवल आकर्षित कसें करावें यासंबंधीं भारतीय व्यापाऱ्यांस सल्ला (५) भारतांत भांडवल गुंतवूं इच्छिणाऱ्यांना साह्य (६) परकीय भांडवल गुंतवणूक-विषयक स्थितीची पाहणी करणें. या कामास अनुषंगिक अशीं इतर कामेंहि या केंद्रांत चालतील. हें केंद्र रजिस्टर्ड सोसायटी असेल व त्यास संचालक मंडळ व अध्यक्षहि राहील.

---

**वहातुकीचें राष्ट्रीयीकरण**—आंध्र स्टेट रोड ट्रॅन्सपोर्ट संघटना आंध्र भागांतील मोटारींच्या वहातुकीचे सर्व मार्ग मार्च १९६६ पर्यंत आपल्या ताब्यांत घेण्याचा विचार करीत आहे. पश्चिम गोदावरी भागांतील १३ रस्त्यावरील वहातूक कॉर्पोरेशननें जूनच्या एक तारखेपासून आपल्या ताब्यांत घेतली आहे. ह्या भागांतील बाकीची वहातूक १ नोव्हेंबरपर्यंत ताब्यांत घेण्यांत येईल.

## सागरी वाहतुकीच्या विकासाला अपुरा पैसा

इंडिअन नॅशनल स्टीमशिप ओनर्स असोसिएशनच्या वार्षिक सभेंत बोलतांना भारताच्या वहातूक मंत्र्यांनीं, तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत सागरी वहातुकीच्या विकासासाठी ५५ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत येईल असें सांगितलें होतें. नॅशनल शिपिंग बोर्डाचे अध्यक्ष श्री. जी. एल. मेहता ह्यांनीं ह्या रकमेबद्दल निराशा व नापसंती व्यक्त केली आहे. पत्रकारांशीं बोलतांना ते म्हणाले कीं, नॅशनल शिपिंग बोर्डानें सर्व परिस्थिति लक्षांत घेऊन आणि जलवहातुकीच्या किमान गरजांचा अभ्यास करून १०८ कोटी रुपयांची मागणी केलेली होती. नियोजित पद्धतीनें देशाचा विकास करीत असतांना अधिक तांतडीच्या गरजांकडे लक्ष द्यावयास पाहिजे ही गोष्ट खरी आहे. तथापि सागरी वहातूक ही फार महत्त्वाची बाब आहे. कारण ह्या वहातुकीपासून तात्डतोब उत्पन्न मिळण्यास प्रारंभ होतो आणि परदेशीय चलनांची प्राप्ति होऊं लागते. भारताच्या परदेशी व्यापारालाहि सागरी वहातुकीमुळें मदत होऊं शकते. १९४७ सालींच सागरी वहातुकीसाठी २० लाख टन वजनाच्या बोटी असाव्या असें ठरविण्यांत आलें होतें, पण, दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस भारताजवळ सुमारें ९ लाख टन वजनाच्याच बोटी असतील. नॅशनल शिपिंग बोर्डानें १६ लाख टनांचें उद्दिष्ट सुचविलेलें होतें. हें उद्दिष्ट कांहीं फार मोठें होतें असें नाहीं. सागरी वाहतुकीच्या विकासासाठी तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत जो पैसा मिळणार आहे तो इतका अपुरा आहे कीं हेहि उद्दिष्ट आतां गांठतां येणार नाहीं. विकासासाठी देण्यांत येणारी रक्कम ८५ कोटीपर्यंत वाढविण्यांत येण्याचा संभव दिसत आहे, ही गोष्ट समाधानाची आहे.

---

### पुणें सें. को. बँकेच्या पोटानियमांत दुरुस्त्या

पुणें सें. को. बँकेचें अधिकृत भांडवल सध्यां १५,००,००० रु. आहे तें ५०,००,००० रु. करण्यांत येणार आहे. डायरेक्टरांचे बोर्डाची निवडणूक सध्यां एका वर्षासाठी होते, ती दोन वर्षांसाठी केली जाईल. बोर्डाचे चेअरमन आणि व्हाइस चेअरमन ह्यांची निवडणूक वार्षिक साधारण सभेंत होते. ह्यापुढें, वार्षिक साधारण सभा झालेनंतर संचालक मंडळाचे होणाऱ्या पहिल्या सभेमध्यें ती निवडणूक होईल. डायरेक्टर बोर्डानें ह्या आशयाच्या पोटनियमांत दुरुस्त्या सुचविल्या आहेत, त्यांचा विचार करण्यासाठी बँकेची विशेष साधारण सभा दि. २६ जुलै रोजीं दुपारीं २ वाजतां बँकेचे मुख्य कचेरींतील सभागृहांत भरणार आहे.

---

### बॉंबे स्टेट को. बँकेचा मॅ. डायरेक्टर

दि बॉंबे स्टेट को. बँक लि. च्या मॅनेजिंग डायरेक्टरचे नेमणुकी-साठी अर्ज मागविण्यांत आले आहेत. जागेचा पगार लायकीप्रमाणें १,५००–१००–२,००० रु. असा आहे. अर्जदारांनीं २० जुलै, १९६० पूर्वीं अर्ज पाठविणेचे आहेत.

---

### पूना अर्बन को. बँकेचें कार्यालय

बँकेचें कार्यालय दि. ४ जुलै १९६० पासून फुले मार्केटसमोर कॉर्पोरेशन बिल्डिंग, २५ शुक्रवार पेठ, ( मंडई बाजार ) पुणें २ येथें सुरूं झालें. त्याचा उद्घाटन समारंभ मा. वा. ब. गोगटे, महापौर, पुणें महानगरपालिका यांचें हस्तें रविवार दि. ३ जुलै १९६० रोजीं सायंकाळीं ४ वाजतां झाला.


# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

— शाखा —

(१) पुणें लष्कर (२) बारामती (३) लोणावळा (४) श्रीरामपूर (५) ओझर ( जि. नाशिक ) (६) खोपोली ( जि. कुलाबा ).

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,१९५ |
| रिझर्व्हज् | रु. १,३८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ८५,००,०००चे वर |

★रिकरिंग डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★शॉर्ट टर्म्स व कॉल डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★मुख्य कचेरींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्स मिळतात.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

रा. बा. साळवेकर
B. A., LL. B.
मॅनेजर

# भोर स्टेट बँक लि.

( स्थापना १९४४ )

मुख्य कचेरी :—भोर, जि. पुणें.
शाखा :—पुणें, पाली व शिरवळ

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | ... | रु. ९१,००० |

*मुख्य कचेरींत भाड्यानें डिपॉझिट लॉकर्संची सोय केली आहे.*

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याज वसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात. बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी :— बुधवार घ. नं. ३६१-६२ पासोड्या विठोबा नजिक. फोन नं. २५७६.

—अधिक माहितीसाठी लिहा—

(—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—)

| | |
|---|---|
| श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष | न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष |
| रावसाहेब य. द. खोले | श्री. चं. रा. राठी |
| श्री. गो. बा. देवी | श्री. बा. ग. धंदुके |

## स्टेट बँक ऑफ इंडिआचा व्याप

### दर आठवड्याला दोन नव्या शाखांची स्थापना

दि स्टेट बँक ऑफ इंडिआच्या ४०० व्या नव्या शाखेचें उद्घाटन १ जून रोजीं कैराणा (उत्तरप्रदेश) येथें झालें. त्या वेळीं भाषण करतांना बँकेचे चेअरमन, श्री. भट्टाचार्य, ह्यांनीं शाखावाढीची माहिती सांगितली. तीन प्रेसिडेन्सी बँका (बंगाल, मुंबई व मद्रास) ह्यांचेमधून १९२१ मध्यें इंपीरिअल बँक निर्माण करण्यांत आली, तेव्हां तिनें पांच वर्षांत १०० नव्या शाखा उघडाव्या असें ठरलें होतें. बँकेनें १९२६ अखेर, ठरल्यापेक्षा ३२ शाखा जास्तच उघडण्याची कामगिरी केली. त्यानंतरहि नव्या शाखा उघडण्यांत येत होत्या, पण १९५० नंतर अडचणी वाढून शाखावाढीची गति मंदावली. पुढें, रूरल बँकिंग चौकशी कमिटीनें, बँकेनें पांच वर्षांत २७४ नव्या शाखा उघडाव्या अशी शिफारस केली, पण बँकेनें फक्त ११४ नव्या शाखांचा कार्यक्रम आंखला. १९५१ ते जून १९५५ अखेर प्रत्यक्षांत फक्त ६३ नव्या शाखा उघडल्या गेल्या. १९४८ ते १९५८ ह्या मुदतींत इतर शेड्यूल्ड बँकांच्या शाखांची संख्या २,५९६ वरून २,९०७ वर गेली. ह्या पार्श्वभूमीवरून विचार करतांना, स्टेट बँकेनें पांच वर्षांच्या आंतच ४०० नव्या शाखा उघडण्याचा विक्रम केला आहे. आतां स्टेट बँकेच्या ८७१ कचेऱ्या आहेत आणि तिच्या सबसिडिअरी बँकांच्या ३६४ कचेऱ्या आहेत. नव्या ४०० शाखांपैकीं ३७६ शाखा ५०,००० पेक्षा कमी वस्तीच्या ठिकाणीं आहेत; ९० शाखा २५,००० ते ५०,००० वस्तीच्या गांवीं आहेत; २०९ शाखा १०,००० ते २५,००० वस्तीच्या गांवीं आहेत आणि ७७ शाखा तर १०,००० पेक्षा कमी वस्तीच्या गांवीं आहेत.

नवी शाखा उघडण्याचे बाबतींत किती पूर्वतयारी लागते, ह्याचा अनुभव असणारांना दरसाल १०० नव्या शाखा, म्हणजे दर आठवड्यास दोन नव्या शाखा सुरू करण्यांतील अडचणींची कल्पना येईल. जागा नोकरवर्ग, सामानसुमान, इत्यादि बाबतींत जमवाजमवीस प्रारंभीं थोडा वेळ लागला, पण १९५७ नंतर मात्र भराभर नव्या शाखा सुरू झाल्या. अशा रीतीनें, स्टेट बँकेच्या स्थापनेचा एक महत्त्वाचा उद्देश सिद्धीस गेला आहे. स्टेट असोसिएटेड बँका स्टेट बँकेंत येण्यामुळें, स्टेट बँक ही आतां सरकारनिर्मित, सरकारी मागीदारीची, एक प्रचंड संस्था बनली आहे; आणखी प्रगतीची आतां पूर्वतयारी झाली आहे. अशा बँकेच्या व्हाइसचेअरमनचे जागीं प्रा. द. गो. कर्वे ह्यांची नेमणूक झाली आहे, ती बँकेला व नव्या व्हाइसचेअरमनलाहि भूषणावह आहे.

बँकेच्या शाखावाढीचा तुलनात्मक तक्ता खालीं दिला आहे.

| सर्कल | नियोजित केंद्रें | उघडलेल्या शाखा | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जुलै-डिसें. | जानेवारी-डिसेंबर | | | | जाने-जून | |
| | | १९५५ | १९५६ | १९५७ | १९५८ | १९५९ | १९६० | |
| बंगाल | १४५ | ९ | ९ | ४२ | ३२ | ३१ | १८ | १४१ |
| मुंबई | १४१ | १० | १६ | ३० | ३० | २७ | ११ | १२४ |
| मद्रास | ९४ | १ | २१ | १९ | २५ | २० | ४ | ९० |
| दिल्ली* | ७२ | — | — | — | १८ | १९ | ८ | ४५ |
| एकूण | ४५२ | २० | ४६ | ९१ | १०५ | ९७ | ४१ | ४०० |

* दिल्ली सर्कल २ जानेवारी, १९५८ पासून सुरू झालें.

१९५५ अखेर, बँकेच्या (२०) नव्या शाखांकडे मिळून ६०.२ लक्ष रु. च्या ठेवी होत्या आणि त्यांनीं मिळून १५.९ लक्ष रुपयांचीं कर्जे दिलेलीं होतीं. शाखा व त्यांचा व्यवहार वाढत जाऊन, एप्रिल १९६० मध्यें नव्या शाखांकडे २८.७२ कोटी रुपयांच्या ठेवी होत्या व त्यांनीं २२.१६ कोटी रुपयांचीं कर्जे दिलेलीं होतीं. नव्या शाखांमुळें, ग्रामीण भागांतील पैसा कसा जतन होऊन बँकिंगच्या क्षेत्रांत येत आहे आणि ग्रामीण भागांतील लोकांना कर्जपुरवठा कसा होत आहे, ह्याची कल्पना येईल. ७.५ लक्ष रु. च्या ठेवी आणि ५.८ लक्ष रु. चीं कर्जें, अशी प्रत्येक नव्या शाखेची सरासरी एप्रिल, १९६० मध्यें पडत होती.

जुलै, १९५५ मध्यें स्टेट बँकेच्या पटावर १४,४६२ नोकर होते. बँकेच्या शाखावाढीमुळें नोकरवर्गहि जास्त लागला. नवीन नेमणुका खालीलप्रमाणें करण्यांत आल्या.

| नव्या शाखा | सब अकौंटंट्स् व हेड कॅशिअर्स | इतर सुपरवायझिंग स्टाफ | कारकुनी व कॅश सर्व्हिस | कनिष्ठ नोकर |
|---|---|---|---|---|
| ४०० | ४१४ | ४०८ | ३,२५४ | २,२६० |

बँकेच्या पटावरील एकूण नोकरांची संख्या आतां २४,३७७ आहे. म्हणजे, गेल्या पांच वर्षांत बँकेनें ९,९१५ लोकांना नव्या नोकऱ्या दिल्या आहेत; नोकरांची संख्या ६८.५% वाढली आहे.

---

### तेलाच्या उत्पादनासाठी रशियाची मदत


गेल्या कांहीं वर्षांत भारत सरकारनें खनिज तेलाचा शोध लावण्याची खटपट केली आणि तिला कांहीं प्रमाणांत यशहि लाभलें. आर्थिक दृष्ट्या तेल उपसणें परवडेल अशा खाणी सांपडल्यावर तेलाच्या उत्पादनाची व्यवस्था करावी लागणें अपरिहार्य आहे. गुजरातमध्यें खंबायत व अंकलेश्वर ह्या भागांत तेलाचे भरपूर साठे उपलब्ध झाले आहेत. ते उपसण्यासाठी रशियाकडून मदत घेण्याचा सरकारचा विचार आहे. भारत सरकारचे तेल व खाणी मंत्री श्री. के. डी. मालवीय ह्या कामासाठी रशियाला गेले होते. रशिअन तंत्रज्ञ व रशिअन यंत्रसामग्री मिळविण्याचा त्यांचा हेतु होता. श्री. मालवीय ह्यांनीं रशिआंत दोन आठवडे दौरा केला. त्यांनीं आपल्या दौऱ्यांत रशिआंतील तेल उत्पादनाच्या कांहीं केंद्रांना व तेलविषयक संस्थाना भेटी दिल्या. त्याचप्रमाणें तेलाच्या धंद्यांतील रशिअन तज्ज्ञ व सरकारी अधिकारी ह्यांच्याशींहि त्यांनीं बोलणी केली. खंबायत व अंकलेश्वर येथील भूमिगत तेलें उपसण्याचे कारखाने काढण्याविषयीं मुख्यतः बोलणीं करण्यांत आलीं. ह्याबाबत करावयाच्या तपशीलवार करारासाठी कांहीं भारतीय तज्ज्ञ आणखी तीन आठवडे रशिआंत राहणार आहेत. रशिआकडून मिळणाऱ्या तांत्रिक मदतीची व यंत्रसामग्रीची नीट कल्पना येण्यासाठी ते रशिअन तज्ज्ञांशीं आणखी बोलणीं करणार आहेत. कदाचित् आणखी कांहीं हिंदी तज्ज्ञ ह्या कामासाठी रशियाला जाण्याचा संभव आहे. तेल उपसण्याची यंत्रसामग्री घेण्यासाठी भारताला ८ कोटी रुपये द्यावे लागतील सुमारें १०० रशिअन तज्ज्ञहि भारतांत येण्याची शक्यता आहे.

---

**पुणें कॉर्पोरेशनला कर्ज**—पुणें कॉर्पोरेशननें आंखलेली फिल्टर्ड पाण्याची योजना अंमलांत आणण्यासाठी महाराष्ट्र सरकारनें २० लक्ष रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. ह्या कर्जावर दरसाल दरशेकडा ४ टक्के व्याज आकारण्यांत येणार आहे. कर्जाची फेड ३० वार्षिक हप्त्यांत करावयाची आहे. सध्यां पुणे कँटोनमेंट भागांत असा पाणी पुरवठा आहे.

# STURDY STABILITY

*Elegence* *Precision*






Great pyramids and sphynx in Egypt are a puzzle to the modern world. They possess incredible intricacy of sturdiness and craftsmanship. They stand centuries together undamaged—Really a wonderful example for sturdiness. As well it is miracleously intricated with craftsmanship. Very few are the examples of such type where sturdiness & elegance go hand in hand.

Similarly in machinery world of today, sturdiness and precision workmanship is well needed. A slightest mistake in designing and workmanship means an immeasurable loss of money, time and work.

*We stand for ....*

Cams & keys of various types.
Plastic & Rubber plantation equipment, Extruders, Spreading machines & mixing mills.
Chemical Engineering equipment, Auto-cloves, pressure-pans, Kiers etc.
Calenders, Beaters and presses of various types
Die-punches & moulds.

**For success**



## THE SOUTHERN MACHINE INDUSTRIES

CULTEKDI ROAD, SWARGATE POONA 2.

Phone : 6640
Gram : 'SOUMACHINE'

Proprietor . SUPANEKAR BROS.

PARKERSON



**कण आणि क्षण**

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

लेखक : –श्री. वा. काळे, संपादक, " अर्थ "

मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. २ रु. ८ आ.

**'अर्थ' ग्रन्थमाला**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली ४ सहकार


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५, १ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाधिवास ' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.